सुवर्णसंधी सभासद अभियान..
लग्नाचा/वाढदिवस शुभेच्छा २ जाहिराती मोफत मिळवा ...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचे द्विवार्षिक सभासद व्हा.व १,०००/- रूपये भरून घरपोच अंक मिळवा.आपली माहिती सभासद/इत्यादी फॉर्म मो.संपर्क.नं.९८६०८७७७८९खालील लिंक/QR वर भरा

१७ व्या वर्षात यशस्वीपदापर्ण करणारे साप्ताहिक..

# प्रगत भारत

सभासद, बातम्या विशेष मुलाखत व व्हेब न्यूज पोर्टल- www.pragatatbharat.com-९८६०८७७७८९

सा.प्रगत भारत वृत्तपत्रक १७ व्या वर्षात यशस्वी पदापर्णा निमित्त हार्दिक शुभेच्छा जाहिरात स्विकारल्या जातील-संपादक
facebook pragatbharat
www.pragatbharat.com
9860 877 789

● वर्ष:१७ ● अंक. क्र.१५ ● साप्ताहिक ● मंगळवार दि. १ ते ७ ऑक्टोंबर २०२४ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ●RNP-PCE / पोस्ट/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००

## अनुसूचितजाती-जमातीआयोगाच्याअध्यक्षपदी मा.खासदार आनंदराव अडसूळ यांची निवड


साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती पहा
pragatbharat.com



**मुंबई:**राज्याच्या अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी माजी खासदार आणि शिवसेना नेते आनंदराव अडसूळ यांची वर्णी लागली आहे.
अनुसूचित जाती आणि जमाती आयोगावर अध्यक्ष आणि तीन सदस्य पद नियुक्तीचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता. त्यानुसार सरकारने अडसूळ यांची अध्यक्षपदी निवड केली आहे. धर्मपाल मेश्राम यांची उपाध्यक्षपदी,तर पुणे पिंपरीचे गोरक्षक लोखंडे आणि पालघरच्या वैदेही वाढाण यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने या संदर्भातील शासन आदेश जरी केला आहे.

## मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची राज्य सहकारी परिषदेच्या अध्यक्ष पदी निवड

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती पहा
pragatbharat.com



**मोहोळ:**माजी आमदार राजन पाटील यांची ''महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदे''च्या अध्यक्षपदी निवड झाली, तशा आशियाचा लेखी आदेश राज्याचे उपसचिव ए पी शिंगाडे यांनी काढला आहे. हे वृत्त मोहोळ येथे समजतात ठीक ठिकाणी या निर्णयाचे फटाके फोडून जल्लोष करण्यात आला.
या निवडीमुळे माजी आमदार पाटील यांना राज्यमंत्र्याचा दर्जा.माजी आमदार पाटील हे सहकारातील मुरब्बी राजकारणी आहेत.त्यांचे वडील स्व. बाबुराव (अण्णा) पाटील यांच्या कडून त्यांना सहकाराचे बाळ कडू मिळाले आहे.माजी आमदार पाटील यांची विविध सहकारी संस्था चालविण्यात व त्या आर्थिक सक्षम करण्यास त्यांचा हातखंडा आहे.
तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायटया,दूध संस्था,खरेदी-विक्री संघ,पतसंस्था यावर त्यांची आजही मजबूत पकड आहे.या पदावर माजी आमदार पाटील यांची नियुक्ती केल्याने त्यांना काम करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.
दरम्यान या पदाच्या माध्यमातून सहकारी चळवळीशी संबंधित सर्व बाबीवर शासनाला सल्ला देणे, सहकार चळवळीचा आढावा घेणे, समन्वयाचा मार्ग सुचविणे,सहकारी संस्थांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी उपाय सुचविणे, सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी धोरणे सुचविणे, महामंडळा मार्फत कोणत्याही प्रयोजनासाठी अभ्यास हाती घेणे यासह अन्य उपाय योजना कराव्या लागणार आहेत. या निवडीमुळे माजी आमदार पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. योग्य मान सन्मान करू चा प्रत्यय आला
दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जन सन्मान यात्रा ता २२ रोजी मोहोळ येथे आली होती. त्यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सत्ता असो वा नसो पक्षाचे काम कायम सुरू ठेवलेले राजन पाटील हे एकमेव नेते आहेत.परंतु त्यांना न्याय देण्यासाठी आम्ही कमी पडलो. मात्र त्यांना योग्य मानसन्मान देण्याचे काम आम्ही करू असे सुतवाच केले होते.त्याचेच हे फलित असल्याचे राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष प्रकाश चवरे यांनी सांगितले

## समानतेसाठी महिलांनी राजकारणात यावे- राहुल गांधी



**नवी दिल्ली:**समानता आणि न्याय प्राप्त करण्यासाठी महिलांनी राजकारणात यावे, असे आवाहन काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी रविवारी केले.राहुल म्हणाले,खरा न्याय आणि समनतेसाठी महिलांनी शक्ती अभियानात भाग घ्यावा, अभियानाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी मिळणार आहे. पर्यायाने महिलांची रुची देखील राजकारणात वाढण्यास मदत मिळणार आहे.
ते म्हणाले, वर्षभरापूर्वी पक्षाने इंदिरा फेलोशिप मोहीम हाती घेतली होती.त्या माध्यमातून महिलांचा आवाज राजकारणात वाढावा, यासाठी प्रयत्न केले. आता मोहीम महिलांच्या सहभागाने अधिक शक्तीशाली झाली असून त्या माध्यमातून महिलांचे नेतृत्व उदयास येत आहे. मोहिमेचे घोषवाक्य अर्धी लोकसंख्या, पूर्ण अधिकार असे आहे.ते सत्यात उतरविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## पाकिस्तानने बेकायदेशीररित्या ताब्यात घेतलेला भारतीय भूभाग रिकामा करण्यासंदर्भातील मुद्दा आम्ही सोडवू-

### संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या अधिवेशनाला संबोधित करताना परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर म्हणाले



**नवीदिल्ली:**पाकिस्तानचे सीमेपलीकडील दहशतवादाचे धोरण कधीही यशस्वी होणार नाही. उलट त्यांच्या कारवायांचे परिणाम त्यांना भोगावे लागतील. त्यामुळे पाकिस्तानने व्याप्त काश्मीर रिकामा करावा, अशा शब्दात परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला ठणकावले.
संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ७९ व्या अधिवेशनाला संबोधित करताना जयशंकर म्हणाले की, आम्ही काल या आमसभेत काही विचित्र दावे ऐकले. सीमेपलीकडील दहशतवादाचे पाकिस्तानचे धोरण कधीही यशस्वी होणार नाही. त्यामुळे त्यांनी दिर्घकाळापासून दहशतवादाशी जोडलेली नाळ तोडावी. पाकिस्तानने बेकायदेशीररित्या ताब्यात घेतलेला भारतीय भूभाग रिकामा करण्यासंदर्भातील मुद्दा आम्ही सोडवू. अनेक देश आपल्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे मागे पडले आहेत. पाकिस्तान त्याचेच उदाहरण आहे.

## टाळगाव चिखली येथील पाटीलनगर धर्मराजनगर रोड चौकास संतशिरोमणी रविदास महाराज चौक नामकरण करावे

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती पहा
pragatbharat.com






**वरील छायाचित्रात संशिरोमणी रविदास मंदिर असून दुसऱ्या छायाचित्रात मंदिरासमोरच टाळगाव चिखली येथील पाटीलनगरच्या खालील असलेले धर्मराज नगर रोडचे काम होत असून याचौकास संतशिरोमणी रविदास महाराज चौक असे नामकरण महापालिकेकडून व्हावे.**

**चिखली:**महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे.आपला इतिहास, संस्कृती आणि वारसा यादृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेपण असून संत महापुरुषांच्या ग्रंथानी,ओव्यांनी आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे.श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज देहू-आळंदी जाणारे वारकरी पायी जातात.महामार्गालगतच धर्मराज नगर रोड येथील चौकात संतशिरोमणी रविदास महाराज यांचे मंदिर आहे.यामंदिर समोर चौक आहे.
टाळगाव चिखली येथील पाटीलनगरच्या खालील असलेले धर्मराज नगर रोडचे काम होत असून या नवीन रोड बगवस्तीकडे जाणारा ही करण्यात आला आहे.तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पिण्याची पाण्याची टाकीचे बाजूला गेले अनेक वर्षापासून असलेल संतशिरोमणी रविदास महाराज मंदिर असून यामंदिरामध्ये संतशिरोमणी रविदास महाराज यांची जयंती व विविध समाजउपयोगी कार्यक्रम होत असून यामंदिराच्या समोरील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नवीन चौकाचे शुशोभिकरण होत असून या चौकाला संतशिरोमणी रविदास महाराज यांच्या नावाने चौकाला भव्य नामकरण महापालिकेच्या वतीने देण्यात यावे असे येथील रहिवासी नागरिक व समाजबांधव यांनी साप्ताहिक प्रगत भारत वृतपत्रकास बोलताना सांगितले आहे.
संतशिरोमणी रविदास महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील,असे येथील संतशिरोमणी रविदास महाराज कमिटीच्या पदाधिकरी यांनी सांगितले आहे.तरी महापालिकेच्या संबधीत विभागाने याकडे लक्ष देऊन चौकाचे वरील प्रमाणे नामकरण करावे की ज्यामुळे टाळगाव चिखलीगावच्या नाव लौकीकातभर पडेल व खऱ्या अर्थाने संताचे विचारांचा संदेश नागरीकांपर्यत पोहचेल.

## पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती पहा
pragatbharat.com



**पुणे:**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईनप्रणालीद्वारे पुणे मेट्रोच्या टप्पा १ अंतर्गत जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानक मार्गावरील प्रवासी सेवेचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ तर टप्पा १ चा दक्षिणी विस्तार स्वारगेट ते कात्रज मार्गिकेचे भूमिपूजन करण्यात आले.तसेच त्यांच्या हस्ते भिडेवाडा येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पहिली मुलींची शाळा स्मारकाचे भूमिपूजन,सोलापूर विमानतळाचे उद्घाटन,बिडकीन औद्योगिक क्षेत्र राष्ट्राला अर्पण करण्यात आले. या अनुषंगाने स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
पुण्याचा चहूबाजूनी विस्तार होत असताना माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, उद्योग,शैक्षणिक संस्थेचे जाळे वाढत आहेत.याचा वाहतूक व्यवस्थेवर ताण येत असून प्रदूषणातही वाढ होत आहे, त्यामुळे पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी असून याकरीता मेट्रोसारखे प्रकल्प महत्वाचे आहेत,आगामी काळात मेट्रोचे जाळे वाढविणे काळाची गरज आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.
या कार्यक्रमास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन दूरदृष्यप्रणालीद्वारे तर मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे,अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील,उद्योग मंत्री उदय सामंत,खासदार डॉ.मेधा कुलकर्णी,श्रीरंग बारणे,आमदार उमा खापरे,योगेश टिळेकर,माधुरी मिसाळ,भिमराव तापकीर,सुनील कांबळे,सिद्धार्थ शिरोळे,आश्विनी जगताप,आदी मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित होते.

**उद्योग आणि पायाभूत सुविधेत महाराष्ट्र देशात अग्रेसर**

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या मदतीने विविध प्रकल्प राबविण्यात येत आहे. आज राज्यात विविध उद्योग येत असून उद्योगाला चालना देण्याकरीता राज्य शासन सहकार्य करीत आहेत. राज्यात ५२ टक्के परदेशी गुंतवणूक झाली आहे, विविध क्षेत्रातील उद्योजक राज्याकडे आकर्षित होऊन उद्योगाला चालना देत आहेत. आपले राज्य उद्योगस्नेही झाले असून उद्योग आणि पायाभूत सुविधेत देशात महाराष्ट्र अग्रेसर झाले आहे.

**पुरंदर विमानतळाकरीता भूसंपादनाची कार्यवाही करा**

पुरंदर विमानतळाकरीता लवकरात लवकर जागा अधिग्रहित करुन शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला द्यावा. याबाबत येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरीता केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालय आणि उद्योग मंत्रालय यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करावे, आगामी काळात पुरंदर विमानतळाचे काम सुरु करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पहिली मुलींची शाळा भिडेवाडा.

**(पान क्रमांक ४ वर)**

# पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

(पान क्रमांक–१ वरून क्रमश:)

येथील स्मारकाकरीता राज्य शासनाने पुढाकार घेतला असून याठिकाणी ऐतिहासिक स्मारक होत आहे, असेही शिंदे म्हणाले.सामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी लोककल्याणकारी योजनांची अमंलबजावणीराज्य शासनाच्यावतीने सामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजना आदी लोककल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्या असून त्याचा नागरिकांना लाभ देण्यात येत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत १ कोटी ९० लाख महिलांना लाभ देण्यात आला आहे, याकरीता वर्षभरासाठी निधीची व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत राज्यातून पहिली रेल्वे कोल्हापूर येथून आयोध्याकरीता सोडण्यात आली असून आगामी काळात राज्यासह पुण्यातून याकरीता प्रयत्न करावेत. यापुढेही विकासाचा आणि कल्याणकारी योजनांचा वेगवान व गतिमान कार्यक्रम असाच सुरु राहील, अशी ग्वाही शिंदे यांनी यावेळी दिली.

पुण्याची वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता मेट्रोच्या कामाला गती– उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रोच्या कामाला सन २०१४ पासून गती मिळाली असून यासाठी महामेट्रो ही कंपनी स्थापन करुन हे काम अत्यंत वेगाने पूर्ण करण्यात आले. पुणे मेट्रोचा पहिला टप्पा देशातील सर्वाधिक वेगाने काम पूर्ण होणारा टप्पा म्हणून ओळखला जातो. शिवाजीनगर ते हिंजवडी दरम्यान टाटा कंपनीच्या मदतीने मेट्रोचे काम करण्यात येत असून ही देशातील पहिली सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावरील मेट्रो आहे. स्वारगेट येथील मेट्रोचे स्थानक ‘मल्टिमॉडेल स्थानक म्हणून विकसित करण्यात येत असून अशाप्रकारचे देशातील पहिले स्थानक असणार आहे. आगामी काळात मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर पुण्यातील विविध भागात मेट्रोने प्रवास करता येईल, असे नियोजन केले आहे, असेही ते म्हणाले.

पुणे ही समाजसुधारकांची भूमी असून येथे क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आठवण करुन देणारे स्मारक होणे अंत्यत महत्त्वाची गोष्ट आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी महात्मा फुले यांच्या पाठिंब्याने भिडेवाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू करुन महिलांना शिक्षणाची दारे खुली करुन दिली. शिक्षणाचा आणि समाजसुधारणेचा मिळालेल्या वारसाची आठवण करुन देणारे सुंदर असे स्मारकाचे काम सुरु होत असून ते आगामी ५०० वर्ष आपल्या प्रेरणा देत राहील,

**श्री. फडणवीस म्हणाले–पुणे हे राज्याचे आर्थिक मॅग्नेट**

पुणे ही सांस्कृतिक, तंत्रज्ञानाची राजधानी आहेच त्याचबरोबर पुणे हे आर्थिक ‘मॅग्नेट’ आहे. पुणे शहर व परिसरात सुमारे १ लाख कोटी रुपयांची कामे करीत आहोत. राज्याचे मॅन्युफॅक्चरिंग इंजिन हे पुणे जिल्हा असून दुसरे आता छत्रपती संभाजीनगर होत आहे. राज्यात विविध प्रकल्पाच्या माध्यमातून हजारो नागरिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असेही फडणवीस म्हणाले.

**स्वारगेट येथील मेट्रोचे स्थानकाचे काम पुणेकरांच्या नावाला साजेसे**–उपमुख्यमंत्री अजित पवार–उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, पुणेकरांच्या नावाला साजेसे असे स्वारगेट येथील मेट्रोचे स्थानकाचे काम झालेले आहे. आज जिल्हा न्यायालय ते स्वारगेट दरम्यान मेट्रोच्या भूमिगत रेल्वेचे लोकार्पण होत असून स्वारगेट ते कात्रज दरम्यान मेट्रोच्या कामाचे भूमिपूजन होत आहे. पुण्याची वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याकरीता मेट्रोचे विविध टप्पे पूर्ण करण्यात येत आहेत. शिवाजीनगर ते हिंजवडी दरम्यान टाटा कंपनीच्या मदतीने काम करण्यात येत आहे. पुण्यात विविध सार्वजनिक विकासाची कामे सुरु असताना पुणेकरांना त्रास होत आहे, ही गोष्ट मान्य करतो. परंतु, आगामी ५० ते १०० वर्षाचा विकास या माध्यमातून होणार आहे.

भिडेवाडा येथील या ऐतिहासिक स्मारकाकरीता उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन राज्य शासनाने जागा ताब्यात घेतली आहे. जागेच्या भूसंपादनाकरीता अंदाजे २०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. याठिकाणच्या भूसंपादनामुळे बाधितांना योग्य तो मोबदला देण्याकरीता राज्य शासनातर्फे पुढाकार घेण्यात येईल. भिडेवाडा स्मारकाकरीता १० कोटी रुपयांची तरतूद पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात आली आहे. भिडेवाडा येथील स्मारकाचे काम उत्तम व दर्जेदार होईल, अशी ग्वाही श्री. पवार यांनी यावेळी दिली.

मोहोळ म्हणाले, केंद्र शासनाच्यामदतीने पुणे शहराला मेट्रो, आयुर्वेदिक महाविद्यालय, नवीन विमानतळाचे टर्मिनल, स्मार्ट सिटी, चांदणी चौकातील पूल, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई–बस, पुणे ते कोल्हापूर, पुणे ते हुबळी वंदेभारत एक्सप्रेस, पुण्यात ३३ किमी मेट्रोचे मार्ग पूर्ण झाले आहेत. महिला सक्षमीकरणाकरीता बेटी–बचाव, बेटी पढाव, लखपती दीदी अशा योजना राबविण्यात येत असल्यामुळे त्या आत्मनिर्भर होत आहेत, असेही श्री. मोहोळ म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांच्या हस्ते भिडेवाडा येथील स्मारकाचे भूमिपूजन होत असल्याचा आनंद मंत्री छगन भुजबळ

**मंत्री श्री. छगन भुजबळ म्हणाले,** क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य तसेच भिडेवाडा स्मारक येथील नूतन इमारतीच्या आराखड्याबाबत माहिती देऊन मंत्री श्री. भुजबळ म्हणाले, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी विविध शिक्षण, आरोग्य अशा सामाजिक सुधारणा केल्या. भिडेवाडा येथील स्मारकाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांच्या हस्ते भूमिपूजन होत असल्याचा आंनद आहे, असही श्री. भूजबळ म्हणाले.

मंत्री चंद्रकांत पाटील प्रास्ताविकात म्हणाले, पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानक मार्गावर कसबा पेठ, मंडई, स्वारगेट असे रहदारीचे भाग जोडल्याने पुण्यातील वाहतूक कोंडी सोडविण्यासोबत व्यापारालाही चालना मिळणार आहे. स्वारगेट येथून शहरातील विविध भागात जाणे शक्य होणार आहे. भिडेवाडा येथील स्मारक हा आपल्या श्रद्धेचा विषय मार्गी लागला आहे, असेही श्री. पाटील म्हणाले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील आदी उपस्थित होते.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

क प्रभाग विद्युत विभाग

**ई निविदा सुचना क्रं. - विद्युत/क प्रभाग/Prabhag/2/29/2024-2025 (प्रथम सुचना)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन खालील नमुद केलेल्या कामांसाठी ई - टेंडरिंग पध्दतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे.

१. प्रचलित दराने GST बिलात अदा केला जाईल त्यामुळे GST वगळुन दर द्यावेत.

| निनो. क्रं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | अनामत रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत (दिवस) | निविदा फॉर्म फी (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| 2/1 | प्र.क्र.२ मधील बोऱ्हाडेवाडी, मोशी व इतर परिसरातील दिवाबत्ती व्यवस्थेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. सन २०२४-२५ | 847210 | 42361 | 8472 | 365 | 1658 |
| 2/2 | प्र. क्र.२ मधील विविध शाळा, इमारतीमधील विद्युत व्यवस्थेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. सन २०२४-२५ | 847443 | 42372 | 8474 | 365 | 1658 |
| 2/3 | प्र.क्र. २ मध्ये व इतर ठिकाणी होणाऱ्या विविध स्पर्धा व कार्यक्रमांकरीता तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था, प्रकाशव्यवस्था व ध्वनिक्षेपण व्यवस्था करणे. सन २०२४-२५ | 846548 | 42327 | 8465 | 365 | 1658 |
| 2/4 | प्र.क्र. २ हमी कालावधी संपुष्टात आलेल्या LED फिटिंगची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847319 | 42366 | 8473 | 365 | 1658 |
| 2/5 | प्र.क्र.२ मनपा उपविभागातील मनपा शाळा, इमारती व उद्यानामधील बोअरवेल पंपाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847424 | 42371 | 8474 | 365 | 1658 |
| 2/6 | प्र.क्र. २ मनपा उपविभागातील Toilet Block चे विद्युतीकरणाची देखभाल दुरूस्ती करणे व आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. सन २०२४-२५ | 847297 | 42365 | 8473 | 365 | 1658 |
| 2/7 | प्र.क्र.२ मधील कार्यक्षेत्रातील हायमास्टची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. सन २०२४-२५ | 847308 | 42365 | 8473 | 365 | 1658 |
| 2/8 | मा.आयुक्त निवासस्थान आविष्कार येथील १००केव्हीए क्षमतेच्या जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847313 | 42366 | 8473 | 365 | 1658 |
| 2/9 | क प्रभागातील मनपा इमारती मधील EPABX यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847395 | 42370 | 8474 | 365 | 1658 |
| 2/10 | क क्षेत्रीय इमारतीमधील जनरेटर व इन्व्हर्टरची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847295 | 42365 | 8473 | 365 | 1658 |
| 2/11 | क प्रभागातील मनपा इमारती मधील वातानुकुलन यंत्रणेची वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे. सन २०२४-२५ | 846562 | 42328 | 8466 | 365 | 1658 |
| 2/12 | प्र.क्र. ६ मध्ये व इतर ठिकाणी होणाऱ्या विविध स्पर्धा व कार्यक्रमांकरीता तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था, प्रकाशव्यवस्था व ध्वनिक्षेपण व्यवस्था करणे. सन २०२४-२५ | 847415 | 42371 | 8474 | 365 | 1658 |
| 2/13 | प्र.क्र. ६ व ८ मनपा उपविभागातील Toilet Block चे विद्युतीकरणाची देखभाल दुरूस्ती करणे व आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. सन २०२४-२५ | 846894 | 42345 | 8469 | 365 | 1658 |
| 2/14 | प्र.क्र. ६ व ८ मनपा उपविभागातील मनपा शाळा, इमारती व उद्यानामधील बोअरवेल पंपाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847347 | 42367 | 8473 | 365 | 1658 |
| 2/15 | प्र.क्र. ६ मधील कार्यक्षेत्रातील हायमास्टची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. सन २०२४-२५ | 847379 | 42369 | 8474 | 365 | 1658 |
| 2/16 | प्र.क्र. ६ व ८ मधील विविध शाळा, कार्यालये व इमारतींमधील विद्युत व्यवस्थेची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847435 | 42372 | 8474 | 365 | 1658 |
| 2/17 | प्र. क्र. ६ मधील परिसरातील रस्त्यावरील दिव्यांच्या नादुरुस्त केबल,बदलने व अनुषंगिक वार्षिक स्वरुपाची कामे करणे. सन २०२४-२५ | 847258 | 42363 | 8473 | 365 | 1658 |
| 2/18 | प्र.क्र. ६ मधील हमी कलावधी संपुष्टात आलेल्या LED फिटिंगची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 846854 | 42343 | 8469 | 365 | 1658 |
| 2/19 | प्र.क्र. ८ मधील कार्यक्षेत्रातील हायमास्टची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. सन २०२४-२५ | 847275 | 42364 | 8473 | 365 | 1658 |
| 2/20 | प्र.क्र. ८ हमी कलावधी संपुष्टात आलेल्या LED फिटिंगची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.सन २०२४-२५ | 846854 | 42343 | 8469 | 365 | 1658 |
| 2/21 | प्र.क्र. ८ मध्ये व इतर ठिकाणी होणाऱ्या विविध स्पर्धा व कार्यक्रमांकरीता तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था, प्रकाशव्यवस्था व ध्वनिक्षेपण व्यवस्था करणे. सन २०२४-२५ | 847456 | 42373 | 8475 | 365 | 1658 |
| 2/22 | प्र.क्र. ८ मधील इंद्रायणीनगर व इतर परिसरातील दिवाबत्ती व्यवस्थेची सन २०२४-२५ मध्ये देखभाल दुरूस्तीची कामे करणे व अनुषंगिक कामे करणे. | 847000 | 42350 | 8470 | 365 | 1658 |
| 2/23 | प्र.क्र. ९ हमी कलावधी संपुष्टात आलेल्या LED फिटिंगची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 846988 | 42349 | 8470 | 365 | 1658 |
| 2/24 | प्र.क्र. ९ मनपा उपविभागातील Toilet Block चे विद्युतीकरणाची देखभाल दुरूस्ती करणे व आवश्यक विद्युत विषयक कामे करणे. सन२०२४-२५ | 847377 | 42369 | 8474 | 365 | 1658 |
| 2/25 | प्र.क्र. ९ मधील शाळा इमारतीमधील विद्युत व्यवस्थेची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847033 | 42352 | 8470 | 365 | 1658 |
| 2/26 | प्र.क्र. ९ मधील कार्यक्षेत्रातील हायमास्टची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. सन २०२४-२५ | 847423 | 42371 | 8474 | 365 | 1658 |
| 2/27 | प्र.क्र. ९ मनपा उपविभागातील मनपा शाळा, इमारती व उद्यानामधील बोअरवेल पंपाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. सन २०२४-२५ | 847384 | 42369 | 8474 | 365 | 1658 |
| 2/28 | प्र.क्र. ९ मध्ये व इतर ठिकाणी होणाऱ्या विविध स्पर्धा व कार्यक्रमांकरीता तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था, प्रकाशव्यवस्था व ध्वनिक्षेपण व्यवस्था करणे. सन २०२४-२५ | 846548 | 42327 | 8465 | 365 | 1658 |
| 2/29 | प्र.क्र. ९ मधील नेहरूनगर व इतर परिसरातील दिवाबत्ती व्यवस्थेची देखभाल दुरूस्तीची कामे करणे व अनुषंगिक कामे करणे. सन २०२४-२५ | 846450 | 42323 | 8465 | 365 | 1658 |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक ३०/०९/२०२४ ते ०७/१०/२०२४ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | :- | दिनांक ०७/१०/२०२४ दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| निविदा पुर्व बैठक दि. व वेळ | :- | निरंक |
| निविदा उघडणेचा दिनांक | :- | दिनांक ०९/१०/२०२४ सकाळी ११ वाजता (शक्य झालेस) |

वरील कामांसाठीचा तपशिल उदा. बयाणा,अनामत रक्कम,निविदाच्या अटी शर्ती, निविदा शेडयुल बी इ. माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची निविदा पध्दत ई टेंडरिंग पध्दतीने मनपाच्या वेबसाईटवरुन निविदा भरावयाची आहे.

कोणतेही कारण देता निविदा पुर्णत: किंवा अशंत: मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहिल. सविस्तर निविदा व निविदेबाबत इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

1. www.pcmcindia.gov.in 2. https://mahatender.gov.in

सदरची ई - निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

**जाहिरात क्रं. - 211**
**का.क्र. - कक्षेका/लेखा/१५/कावि/३२/२०२४.**
**दिनांक - २६/०९/२०२४.**

**सही/-**
**अण्णा बोदडे**
**उपआयुक्त, ‘इ’ क्षेत्रिय कार्यालय**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**